# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-09.06.2026** **वार- मंगळवार**

---

**मुख्यमंत्री**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाकांक्षी ठरणाऱ्या 56 किलोमीटर लांबीच्या 'पाताळलोक' भुयारी मार्ग प्रकल्पाच्या सर्वेक्षणाला सुरुवात झाली असून नोव्हेंबरपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण करून डिसेंबरअखेर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी ही माहिती आज दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या आठवड्यात पुण्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत 'पाताळलोक' भुयारी मार्ग, अंतर्गत रिंग रोड आणि उच्च क्षमता द्रुतगती मार्ग अर्थात एचसीएमटीआर या तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.
या तिन्ही प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या कंपनीचे अध्यक्ष महापालिका आयुक्त असतील, तर विविध विभागांचे अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील. आयुक्त नवल किशोर राम यांच्या माहितीनुसार, 'पाताळलोक' प्रकल्पासाठी आवश्यक सर्वेक्षणाचे काम सुरू झालं आहे. प्रकल्पाला गती देण्यासाठी व्यवहार्यता अहवाल आणि सविस्तर प्रकल्प अहवाल स्वतंत्र न करता एकत्रितपणे तयार करण्यात येणार आहेत. जून महिन्यापासून या अहवालाच्या तयारीचं काम सुरू झाललं असून ते पूर्ण करण्यासाठी सुमारे पाच महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे.

**पालखी मुक्काम**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पारंपरिक मुक्कामस्थळात अचानक बदल करण्यात आल्याने निमगाव केतकी परिसरातील ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता शेकडो वर्षांची परंपरा मोडीत काढण्यात आल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी या निर्णयाविरोधात विशेष ग्रामसभेचं आयोजन केलं. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील प्रत्येक मुक्कामस्थळाला धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व आहे. सराफवाडी रोडवरील महावितरण कार्यालयासमोरील प्रांगणात दरवर्षी पालखीचा मुक्काम असतो. मात्र, यंदा हा मुक्काम इरिगेशन वसाहतीमध्ये हलविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सदनिका**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीए च्या गृहनिर्माण योजनेतील सदनिकांच्या सोडतीत पात्र ठरलेल्या मोठ्या संख्येतील लाभार्थ्यांनी पुढील प्रक्रिया करण्यास नकार दिल्याने 472  सदनिका वितरणाविना शिल्लक आहेत. आता त्या इतर लाभार्थींना पुन्हा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांसाठी आता नवी संधी निर्माणझाली आहे. पीएमआरडीएच्या आकडेवारीनुसार, एकूण 871 सदनिकांसाठी झालेल्या सोडतीत 399 लाभार्थ्यांनी आपल्या सदनिका स्वीकारल्या आहेत. मात्र, तब्बल 399 लाभार्थ्यांनी सदनिका नाकारल्या असून 73 लाभार्थ्यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अशा लाभार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया रद्द करण्यात येणार आहे.

**कारवाई**

रेडी मिक्स काँक्रिट (आरएमसी), डिझेल,खडी आणि इतर बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या दरांमुळे पुणे शहरातीलसिमेंट काँक्रिट रस्त्यांच्या कामांवर परिणाम होत असून ठेकेदारांनी महापालिकेकडे वाढीव निधीची मागणी केली आहे.

मात्र, या मागणीला महापालिकाप्र शासनाने स्पष्ट नकार देत कामे नियोजित खर्चात पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. महापालिकेतर्फे शहरात सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीची सिमेंट काँक्रिट रस्त्यांची कामे सुरू आहेत. अशा कामांना 'भाववाढ सूत्र'लागू होत नसल्याने काम अपूर्ण ठेवल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

**<u>वाहतूक</u>**

वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पुणेप्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) 'रडार' यंत्रणेच्या माध्यमातून मोठी कारवाई केली आहे. गेल्या सहा महिन्यांत 64 हजार 310 वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यापैकी सर्वाधिक कारवाई विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर झाली आहे. पुणे आरटीओकडे सध्या आठ अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहनं असून त्यांच्या छतावर 'रडार' यंत्रणा बसविण्यात आली आहे. या यंत्रणेच्या साहाय्याने वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्या वाहनांची नोंद घेऊन त्यांच्यावर तत्काळ कारवाई केली जाते.

**<u>धडक कारवाई</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चिखली, कुदळवाडी आणि पवारवस्ती परिसरातील अनधिकृत बांधकामांवर आज महापालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. कड़क पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत जवळपास 28001 चौ. फूट क्षेत्रफळाची 11 अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

**<u>विषारी दारू</u>**

फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात बाधित तीनही रुग्णांची प्रकृती आता पूर्णपणे सुधारली असून त्यांना आज यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार या सर्व रुग्णांवर संपूर्णपणे मोफत उपचार करण्यात आले.

**<u>जनगणना</u>**

जनगणना 2027 अंतर्गत सुरू असलेल्या घर सूचीकरण आणि  घर गणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अवघे सहा दिवस शिल्लक राहिले असून नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना अचूक आणि संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावं, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने केले आहे.

**<u>निवड पाध्ये</u>**

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ वेस्टर्न रीजनच्या पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या बैठकीमध्ये अध्यक्ष म्हणून किरण शांताराम यांची तर उपाध्यक्षपदी आशय फिल्म क्लबचे सचिव वीरेंद्र चित्राव यांची निवड करण्यात आली आहे. याच बैठकीत कार्यकारीणीचे 12 सदस्य आणि 7 स्वीकृत सदस्यांची निवड 2023-27 या कालावधीसाठी करण्यात आली.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 35  पूर्णांक 6 आणि किमान 25 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपारनंतर विजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.**